गुरु-शिष्य

# गोखले—गांधी






लेखक

पुरुषोत्तम पांडुरंग गोखले

कऱ्हाड ( सातारा )

प्रथमावृत्ति
१९६६

★

मूल्य २५ पैसे

प्रकाशक :-
सौ. सुलोचना गोखले
४३६ सोमवार पेठ,
कऱ्हाड.

*

मुद्रक :-
वि. रा. नावडीकर
श्रीदत्त प्रि. प्रेस,
कऱ्हाड.

# प्रस्ताव.

१९६६ च्या १९ फेब्रुवारीस भारतसेवक नामदार गोखल्यांची पुण्यतिथी येते. वीस वर्षापूर्वी ( १९४६ ) १९ फेब्रुवारीलाच ब्रिटिश पार्लमेंटात हिंदुस्थानची राज्यघटना हिंदी लोकांच्या इच्छेप्रमाणे घडवून आणण्याची घोषणा झाली होती याची आठवण होते. जशी गोखल्यांची ५१ वी पुण्यतिथी फेब्रुवारीत आहे, तशीच ९ मे १९६६ रोजी गोखल्यांची जन्मशताब्दि आहे. ती सर्वत्र सरकारी पातळीपासून लोकप्रतिष्ठेपर्यंत साजरी होणारी आहे. ना. गोखल्याहून तीनच वर्षांनी लहान पण त्यांचे शिष्य म्हणून महात्मा गांधीचा लौकिक आहे. त्या राष्ट्रपित्याला दिवंगत होऊन ३० जानेवारी १९६६ रोजी दीड तप होते. त्यांच्याही जन्मशताब्दि-समारोहाच्या योजना आतापासून सुरू झाल्या आहेत. तेव्हा या राजकारणाला अध्यात्माची जोड द्यावी म्हणणाऱ्या गुरुशिष्यांची ओझरती ओळख येथे दिली आहे. या गुरुशिष्यांची प्रशस्ति आंग्ल कवि सेसिल याने २६ जानेवारी १९१४ ला केल्यानंतर बरोबर तीन तपानी भारताचे प्रजासत्ताक स्वातंत्र्य अवतरले, हे लक्षात भरते.

कराड. }  — पु. पां. गोखले

उमलत्या भारतीयांच्या

सत्वधीरतेस

**सादर समर्पण.**

# गोखले - गांधी

## १ ना. गोखलेस

तूते ज्यास खराखुरा सुत गणी रे आपुला भारत ।
पुण्यश्लोक पुराण आर्यकुळिचा मूर्त द्वितीय स्थित ।।
जो तू चित्ति विराजसी अमुचिया तैसा विराजावया ।
तू सत्पात्र पदी प्रधान जरि की येतास आंग्लान्वया ।।१।।

आम्ही त्या तुज वंदितो, तुजकडे येतो अम्ही गोखले, ।
पूजाद्रव्य वहावया निज असे पुण्यात्मया आखले ।।
ज्याची आणिक भारतीय जननी, ना पुत्र ऐसा कुणी ।
जै-जै-कार करील जो न तुझिया नावे मनापासुनी ।।२।।

(ता. २६-१-१४ रोजीं लंडन येथे मिस्तर के. एच्. डी. सेसिल यांनीं केलेल्या कवितेचा अनुवाद)

# २ गोपाळ कृष्ण गोखले

चिपळूण तालुक्यातील कोतळूक येथें यांचा जन्म ९ मे १८६६ रोजी झाला. राजाराम कॉलेज कोल्हापूर व एल्फिन्स्टन् कॉलेज मुंबई येथून हा गरीब १८८४ साली बी. ए. झालेवर डेक्कन एज्युकेशन सोसायटीत लागला. १९०२ पर्यंत फर्ग्युसन कॉलेज पुणेमध्ये गणीत, अर्थशास्त्र, इतिहास व इंग्रजी या विषयांचे अध्यापन करून पुढे ब्रिटिशांच्या कलकत्ता येथील साम्राज्यशाही विधि-मंडळात ते निवडून आले. न्यायमूर्ति रानडयास गुरु मानून १८८७ सालापासून त्यानी सार्वजनिक सभा पुणेचे चिटणीस म्हणून काम केले व सभेचे त्रैमासिकही संपादले. १८८८ पासून १८९२ पर्यंत सुधारकाची इंग्रजी बाजू ते संपादित. पुण्याच्या (१८९५) काँग्रेसचे ते चिटणीस होते. १८९७ मध्यें वेल्बी–कमिशनपुढे साक्ष देण्यास इंग्लंडमध्ये ते हिंदुस्थानचे प्रतिनिधि होऊन गेले होते. १९०० मध्ये मुंबई प्रांतिक विधिमंडळाचे ते सभासद झाले. त्यावेळी जमीनमहसूल-पद्धतीवर टीका करून फिरोजशहा मेथाबरोबर सरकारच्या निषेधार्थ

त्यानी बहिर्गमनहि केले. या सर्व अनुभवसिद्धीने जय्यत असे गोखले कलकत्त्याच्या विधिमंडळात गेल्यावर, आपल्या अर्थसंकल्पीय भाषणानी जगभर गाजले १९०४ मध्यें युनिव्हर्सिटी बिलावरही ते कडकडले. लॉर्ड कर्झनच्या तोंडावर ब्रिटिशांच्यापेक्षा औरंगजेब पुष्कळच बरा म्हणून सांगणारा गोखल्यांच्यासारखा नामदार विरळा! १९०५ सालच्या बनारस काँग्रेसचे ते अध्यक्ष निवडून आले. याच वर्षी ते मुंबई युनिव्हर्सिटीचे फेलो व पुणे म्युनिसिपालिटीचे अध्यक्षहि होते. १९०५ साली त्यानी निष्काम कर्मयोगाने भारताची सेवा करणारी परंपरा राजकारण–समाजकारणात निर्माण करावी म्हणून, भारत-सेवकसमाजाची स्थापना केली. १९०८ साली मोर्लेमिंटो सुधारणाना भारत–संमत वळण त्यानी लावले. १९१० साली दक्षिण आफ्रिकेतील दडपशाही व मुदतबंदी मजूरपद्धति बंद करण्याबद्दल त्यानी सर्व सनदशीर खटपट केली. १९११ साली प्राथमिक शिक्षण सर्व हिंदुस्थानभर सक्तीचे व मोफत करावे म्हणून धडपड चालविली. १९१२ साली दक्षिण आफ्रिकेतील भारतीयावर वर्णविद्वेषाने ज. स्मट्चे सरकार करीत

असलेल्या दडपशाहीविरुद्ध महात्मा गांधी सत्याग्रह करीत होते. त्यात गोखल्यानी तडजोड घडविली. १९१३–१४ साली पब्लिक–सर्विस–कमिशनच्या कामी विलायतेची वारी व बौद्धिक दगदग त्यानी केली. त्या आणि जन्मभर केलेल्या यातायातीचा परिणाम महात्मा गांधींच्या या राजकीय गुरूंच्या प्रकृतीवर होऊन ते देवाचरणी दिनांक १९ फेब्रुवारी १९१५ स गेले. त्यांच्या पुण्यस्मृतीस शतशः प्रणिपात.

– समर्थ, सातारा.

★

# ३ भारतसेवकास कृतज्ञतांजलि.

“ मला ते गंगेसारखे भासले ” असा आपल्या पहिल्याच भेटीचा अभिप्राय महात्माजींनी वर्णन केला आहे. गंगा जशी आपण स्वतः वहात असता मोठी मोठी होत जाते आणि अनेक लहानमोठ्या ओढ्याओढ्याना पोटात समाविष्ट करते, इतकेच नव्हे, तर आपल्याकडे येणारांची शरीरे, मने, कपडे स्वच्छच स्वच्छ करीत रहाते,

तशीच नामदार गोखल्यांची देशसेवक परंपरा बहुविध, संग्राहक, डोळस नि शीलवंत आहे. राजकारणाला अध्यात्माची जोड मिळाली पाहिजे ही नामदारांची मनीषा शिष्योत्तम महात्माजींनी पुरी केली नि हिंदुस्थानातल्या लोकशक्तीकडे भगिरथासारखे सगळ्या जगाचे लक्ष वेधले. "मोहनदास करमचंद गांधी हे हिंदुस्थानला 'देणे ईश्वराचे' आहे" हे ना. गोखल्यानी दक्षिण आफ्रिकेतील महात्माजींच्या लढ्याचे वेळीच सांगितले होते. हे ध्यानात घेतले म्हणजे "गुरुशिष्यांची ओळख" कशी पटावी लागते, याचे रहस्य उलगडते.

पण यापेक्षाही ना. गोखल्यांचे महत्त्व तरुण पिढीला निराळ्याच दृष्टीने वाटेल. त्यांची आठवण झाली की अभ्यासू अंतःकरणांतून सहज उद्गार उमटतात– "परदुःखेन दुःखिता विरलाः !" म्युनिसिपालिटीच्या कंदिलावर अभ्यास करावयास लागूनही गोपाळराव गोखले विद्वान झाले; इंजीनिअर होऊन खोऱ्याने पैसा ओढण्याची संधि असता टिळक–आगरकरांच्या स्वार्थ-त्यागी देशभक्तीचे अनुकरण करून तरुणांचे शिक्षण,

लोकमताला राष्ट्रभक्तीचे वळण, औद्योगिक उभारणी, अस्पृश्यतानिवारण, इत्यादि बहुविध चळवळींच्या सहकारी, संयमी आणि समन्वयी उभारणीने भारताचे खरेखुरे रचनाकार आपल्या सेवाव्रताने व्हावयाचे त्यानी ठरविले; माणसामाणसांच्या कलागती तोडण्याची वकिली न करता, सुधारणेची शेखी मिरविणाऱ्या राष्ट्रानी कःपदार्थ लेखलेल्या आपल्या मायभूमीची यशस्वी वकिली गोखल्यानी केली; भारतीय मुलकी सत्ताधारी होण्यापेक्षा नम्र भारतसेवक होण्यातच गोखल्यानी भूषण मानले नि भारतसेवक–समाजाची स्थापना करून दुसऱ्या नररत्नाना भारतसेवेच्या कोंदणांत बसवले; फार काय, कर्झनशाहीसारख्या सुलतानशाहीला आपल्या अभ्यासू वृत्तीने तोंड देऊन "हिंदुस्थानचा ग्लॅडस्टन हाच!" असे जगाकडून धन्यवाद घेतले; खंबीर बुद्धि, पिळदार स्वभाव, उत्कृष्ट भावना, निर्मळ निरीक्षण आणि दूरदर्शी उपाययोजना यांच्या जोरावर केवळ एकोणीसाव्या वर्षापासून सार्वजनिक कामास लागलेल्या गोखल्यानी आपल्या प्रत्येक शब्दाला, प्रत्येक पावलाला आणि एकंदर जीवनाच्या संकलित ओघाला

पावित्र्याची आणि पुरुषार्थाची जोड दिली; इत्यादि इत्यादि आठवणी येतात आणि गोखल्यांच्या पुण्य-स्मृतीवर डोळे कृतज्ञतेचा अभिषेक करू लागतात.

" माझ्या देशबांधवांच्या आकांक्षाना मी मर्यादाच मानीत नाही " असे मनमोकळेपणाने जगाला सांगणारे काँग्रेसच्या काशी येथील अधिवेशनाचे अध्यक्ष नामदार गोखले प्रतिपक्षाचा हृदयपालट घडविण्यावर लक्ष देत आणि आपल्या पोलादी मुठीवर रेशमी हातमोजा चढ-वूनच वेळप्रसंगी सामना करीत. वंगभंगाच्या वेळी स्वदेशी–बहिष्काराला पाठिंबा देणारे गोखले आपल्या असाधारण नैतिक धैर्यामुळे हिंदुस्थानचे सुसंस्कृत नेते आणि पहिले परराष्ट्रीय वकील म्हणून गाजले. त्या गोखल्यापासून भारतोन्नतीचा निजध्यास व राजकार-णाचे अध्यात्मीकरण यांची स्फूर्ति घेऊन महात्मा गांधींनी आपल्या सत्याग्रहाने जगाच्या शांतियुगाची अरुणप्रभा हिंदी स्वराज्याच्या रूपाने फाकविण्याचा चमत्कार करून दाखविला आहे. " शिष्यादिच्छेत्पराजयम् " अशा गुरुच्या सात्विक अंतःकरणाने महात्मा गांधींच्या विक्रमा-कडे पहावयास गोखले असते तर–?

पण या विषण्णतेपेक्षा कृतज्ञता आज हिंदुस्थानच्या तरुणाना बजावते आहे की गोखले–गांधींचे नांव चालवावयाचे असेल तर–

'प्रतिपक्षाशी अगर त्यासंबंधी बोलताना सडेतोड पण सादर व स्वाभिमानपूर्वक बोलावे; जिभेने उच्चारलेला वा हाताने लिहिलेला शब्द डोळ्यानी धुण्याचा प्रसंग स्वप्नातसुद्धा येऊ नये; टाकलेले पाऊल विचाराने खडेखंब असावे; क्वचित् प्रसंगी घसर झाल्यास ती उघड्या हृदयाने कबूल करण्याइतकी सहजता सज्ज राखावी; हाती घेतलेल्या कामाचा पिच्छा एकनाथाच्या एकनिष्ठेने पुरवावा व त्यासाठी वेळ पडल्यास क्यासाब्यांकाचा कस दाखवावा आणि हे सर्व करताना पतितांच्या पावनतेसाठीं झटावे."

हे व्रत निष्ठेने आचरले पाहिजे आणि हिंदुस्थानच्या स्वराज्याला जगाचे धन्यवाद घेतले पाहिजेत.

– माउली, मिरज.

★

# ४ नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांचे नामस्मरण

ज्या महापुरुषाने आपल्या गरीब देशबांधवांची सेवा ज्ञानप्रसाराने आणि होईल तेवढ्या बौद्धिक कुशलतेने करण्यासाठी आजन्म गरीबी पतकरली, त्या गोपाळ कृष्णांचे स्मरण गरीब भारतांत निकोप लोकशाही निर्माण करू इच्छिणारा भारत कृतज्ञतेने केल्याशिवाय कसा राहील ?

## भारतसेवकाचे कार्य

भारतातील आम जनता निदान अक्षरमित्र तरी निखालस झाली पाहिजे आणि ती जबाबदारी जनतेच्या खिशातून करांचे रूपाने पैसे घेऊन कारभार करणाऱ्या सरकारला लवकरात लवकर पार पाडली पाहिजे, हे १९११ सालीच त्या वेळच्या सुलतानी (सैतानी हे त्याचे महात्माजीकृत भाषांतर राजकारणात पुढे रूढ झाले.)

ब्रिटिश सत्तेलाही केवळ लोकशाहीच्या प्रस्थापनेसाठी बजावण्याला गोपाळ कृष्णानी एक विधेयक मांडले होते आपले खरे धनी आम जनता होय आणि तिला शहाणी करणे हे आपले कर्तव्य आहे, याची जाणीव ठेवणारा व ठेवविणारा भारतातील नामदार म्हणून शिक्षणेतिहासात गोपाळ कृष्णाचे नाव अजरामर झाले आहे. बहुजनसमाजाच्या जीवनाचा सूक्ष्म अभ्यास करून त्याच्या हिताच्याच प्रगतीसाठी आपल्या अकलेचा पवाड गोपाळ कृष्णानी विधिमंडळाबाहेर एवढा घातला होता की आखीव, रेखीव, कापीव आणि आदबशीर शब्दानी गोपाळ कृष्णानी आम जनतेची आणि भारताची मांडलेली बाजू परकीय सत्तेला कडू कोयनेलासारखी मुकाट्याने गिळावी लागे व आदले वर्षी गोपाळ कृष्णानी केलेल्या सूचनांची अंमलबजावणी पुढील वर्षाच्या अर्थसंकल्पांत केल्याशिवाय गत्यंतर नसे. शास्त्रीय पुस्तकी पांडित्याला जनतेच्या प्रत्यक्ष सुखदुःखाच्या छाननीची जोड दिल्याशिवाय आणि आम जनतेचे नि भारताच्या जागतिक प्रतिष्ठेचे प्रश्न निरलस सेवाबुद्धिने सोडविल्याशिवाय

कोणालाही खऱ्याखुऱ्या अर्थाने भारतसेवक (देशभक्त) होता यावयाचे नाही, असा गोखल्यांच्या मनाचा पिंडच असल्याकारणाने, त्यानी मुत्सद्देगिरीने आपले व भारताचे नाव केले. जगातील लॉर्ड कर्झनसारख्या कडव्या कीचकाकडूनही कौतुकाचे नसले तरी काकूळतीचे आहेर घेतले नि पारतंत्र्यातही भारत आपली प्रतिष्ठा प्राणपणाने जपतो हे सिद्ध केले. याच एका अर्थाने गोपाळ कृष्ण गोखले हे नामदार होते व नामदार म्हणूनच ऐतिहासिक समीकरणाने लोकस्मरणात नांदत आहेत.

गोपाळ कृष्ण गोखले हे मऊ-मवाळ होते असा लौकिक आहे. राणा भीमदेवी भाषणे करून नुसतीच राळ उडविणे हा त्यांचा स्वभावच नव्हता मुळी ! मवाळपणा म्हणजे भागुबाईपणा नव्हे. भीतीसारखी मंथरा नाही, पण निर्भयता देखील शिमग्यातील शिवराळपणाची शूर्पणखा होऊन कसे चालेल ? संयम, शिस्त आणि शहाजोगपणा हीच शेवटी उपयोगी ठरतात. दैवाची एक मात्रा कमी करणाराच देव ठरतो. म्हणून

दैवास धसाला धरून त्याच्यावर मात करताना आपले पेच बेमालुम टाकणाराच धोरणी ठरत असतो. नामदार गोखल्यांच्या मवाळ राजकारणांत हेच " नम्र झाला भूता । तेणे कोंडिले अनंता ॥ " धोरण होते.

पुंजीवाद विरुद्ध समाजसत्ता–वाद, गोरी जनता विरुद्ध काळी जनता, यंत्रयुगातून विद्युद्युगांत उत्क्रांत होणारी संशोधक बुद्धिमत्ता विरुद्ध निसर्गदत्त शक्ति–संपत्तिवरच संतोष मानणारी जीवनिका, असा हा विरोध-विकासाचा कूटप्रश्न जगापुढे उभा आहे. तो सोडविण्यासाठी अध्यात्माची आवश्यकता पाश्चिमात्य राष्ट्रातील धुरीणाना भासत असून भगवद्गीतेचा कर्मयोग समजावून घेण्यासाठी ते धडपडत आहेत. म्हणून धर्म व संस्कृतीच्या अवास्तव कल्पनानी बेफाम होऊन विद्युद्युगाकडे भारत पाठ फिरवील तर तो स्वताचा व आपल्या सहकार्याच्या अभावाने जगाचाही घात करील. या प्रखर जाणीवेनेच पंडित जवाहरलाल आपल्या प्रत्येक भाषणात आणि कृतीत भारतातील आम जनतेच्या प्रश्नांची सोडवणूक करताना, भारतीय

प्रतिष्ठा जगात सांभाळताना व जगाच्या शक्तीयुगाची समस्या धीमेपणाने सोडविताना विचारपूर्वक, आखीव रेखीव पावलानी चाललेले होते. त्या वाटचालीस यश मिळावे म्हणून प्रत्येक भारतीयाने पराकाष्ठेने सहकार देणे यातच गोखल्यांची पुण्यतिथी साजरी करण्याचे खरे श्रेय आहे.

– दैनिक प्रकाश, कऱ्हाड.

*

# ५ आगरकरांची थोरवी.

सुधारकातील आगरकरांच्या मृत्युलेखात गोखले लिहितात की–

“ एका थोर पुरुषाने शेवटची विश्रांति घेतली. त्यांच्या मृत्यूने पुणें किंवा महाराष्ट्रच नव्हे तर सर्व देशाला दैन्य आले...जन्मतःच मोठेपण मिळणे हे भाग्य थोर; पण मोठेपणा स्वतःच संपादन करणे हे अधिक थोर भाग्य. विद्वान् पंडित, कळकळीचा देशभक्त, निर्भय नि जोरदार शीलाचा असा थोर पुरुष म्हणजेच

आगरकर ! त्यांच्यासारखी माणसे कित्येक वर्षात एखादे वेळीच जन्माला येतात व म्हणूनच त्यांचा मृत्यु म्हणजे राष्ट्रीय आपत्ती होय. "

– आगरकर चरित्र (गोखले)

★

# ६ गुरु–शिष्य

प्रभुने मनात आणावे आणि सृष्टीने स्वरूप शृंगारावे अशी स्थिती गुरु–शिष्य म्हणून मानले गेलेल्या गोखले-गांधी या भारतसेवकांची आहे. ' राजकारणाला अध्यात्माचा रंग चढला पाहिजे ' ही गोखल्यांची तळमळ, तर ' वारांगनेव नृपनीतिरनेकरंगा ' भारतातच नव्हे तर साऱ्या जगात अजून असताना महात्मा गांधींनी तिला आपल्या परी संत कान्हुपात्रा करून सोडायला कमी केले नाही. सत्याग्रह आणि अहिंसा यांचे अध्यात्मिक अर्थ चिकित्सक व सूक्ष्म बुद्धिला असविता येतील तितके तिने वसवावे, आणि गांधींच्या

राजकारणाचा कस त्यावर लावावा, म्हणजे पटेल की. धनप्रधान पश्चिमेची व ऋणप्रधान पूर्वेची, अशा संस्कृती आपआपले पाणी एकमेकीवर उडवू लागताच जी रंग-पंचमी साजरी होते, तीत अध्यात्मावर अधिष्ठित झालेल्या पूर्वेच्या संस्कृतीलाच विजयविलासिनी म्हणून मिरवण्याचे भाग्य गांधींच्या हस्ते लाभत आले. तरवारीने साम्राज्ये कमावता, राखता व तळपवताही येतात; पण साम्राज्य-शाहीच्या डोक्यावर आणि म्हणूनच तिच्या बहिणी ज्या वतनदारी, भांडवलशाही व दिमाखशाही त्यांच्याही डोक्यावर, स्वतःच्याच हातातील तलवारी डायोनिसी-असच्या तलवारीसारख्या नंग्या लटकत असतात. यांत्रिक युगाची विश्वामित्री सृष्टी आजकाल घटोत्कची बाजाराचा अनुभव चाखू लागली आहे आणि मयासुराने निर्माण केलेल्या पांडवप्रासादात दुर्योधनाची जशी हरवकत फटफजिती होत राहिली तशीच आज केवळ उपभोगरतांची अवस्था होत असून, मानसिक शांति-समुद्राचा दिवसेदिवस मरुप्रदेश होऊ पहात आहे. अशा वेळी स्वामी विवेकानंदानी म्हटल्याप्रमाणे वेदान्त-धर्माची अगर गीताधर्माची दीक्षा जर पश्चिमेला मिळेल

आणि हिंदुस्थान आपल्या संस्कृतीनिशी अभ्युदयाचा राजरस्ता आक्रमील तर? तर गेल्या महायुद्धातील डोळे फिरवणाऱ्या नरमेघाला कंटाळून आपआपले हातपाय आवरते घेऊ म्हणणाऱ्या जगाला जे शांतीयुग हवे आहे, ते लाभू शकेल. भारतीय संस्कृतीच्या गंगेने इस्लामी संस्कृतीची सरस्वती आपल्यात मिळवून घेतली, तशीच पाश्चिमात्य संस्कृतीची यमुनाही सम–रस करून घेतली तरच भारतवर्षाचे नष्टचर्य कायमचे संपेल असे गोखल्यांचे गुरु न्या. रानडे म्हणत. पण नारायणनामा-पुरताच नारदाला गुरु करून स्वतःच्या दिव्योपभोगानी प्रल्हादाने ज्याप्रमाणे खांबातून परमेश्वराला प्रगट व्हावयास लावले, त्याप्रमाणेच भारतोन्नतिचा निजध्यास व राजकारणाचे अध्यात्मीकरण यांची स्फूर्ती गोखल्या-कडून घेऊन महात्मा गांधींनी आपल्या सत्याग्रहाने जगाच्या शांतियुगाची अरुणप्रभा फाकवण्याचा चमत्कार करून दाखवला आहे. २० व्या शतकाचा ख्रिस्त म्हणून पश्चिमेकडील बुद्धिसागर महात्माजींना जो मान देतात त्यातील रहस्य दुसरे काय बरे आहे? पीठाचे पाणी दूध म्हणून देणाऱ्या आईला बाजूला सारून उपमन्यूने

क्षीरसागर मिळवला, त्याचप्रमाणे गोखल्यांच्या भारत-सेवक संस्थेच्या अध्यक्षपदाला व सभासदत्वाला आदर-पूर्वक प्रणाम करून महात्मा गांधींनी आपल्या कर्तब-गारीचा आकाशपट उभारला, हे शिष्यापासून पराभवाची इच्छा करणाऱ्या गुरुच्या सात्विक अंतःकरणाला तरी अभिमानास्पदच वाटेल. परतंत्र हिंदुस्थानचे ग्लॅडस्टन म्हणून ब्रिटिश साम्राज्यभर गुरु गाजले, तर आगामी शांतियुगाचे ध्वजधारक या नात्याने स्वातंत्र्योन्मुख हिंदुस्थानचे महात्मा म्हणून शिष्य दुनियेभर दुमदुमले. हे दृश्य रमणीय तसेच वंदनीय नाही काय ?

" राजनैतिक क्षेत्रमें गोखलेने जीतेजी जैसा आसन मेरे हृदयमें जमाया और जो उनके देहान्तके बाद अब्भी जमा हुआ है वैसा फिर कोई न जमा सका " ( आत्मकथा अ. २८ ) महात्मा-जींची ही हृदयवाहिनी औपचारिक विनयशीलतेची नाही. फिरोजशहाना हिमालय व लोकमान्याना सागर संबोधणारे महात्माजी " गोखले गंगा की तरह

मालुम हुए, उसमे मै नहा सकता था " असा निर्वाळा देतात. तेव्हा 'हृदयाशी हृदय मिळण्याइतकी' एक-स्वरुप स्पंदनेही मूळ मनोवृत्तीतच असली पाहिजेत यात शंका कसली ? 'निमित्तमात्रं भव सव्यसाचिन्' असे भगवन्तांनी अर्जुनाला सांगितले, त्याचप्रमाणे संसिद्ध शिष्यही गुरुशी वागत असतो. तथापि गुरुशिष्यांची एकजीव मिळणी व्हायलाच पाहिजे व ती तशी व्हायला मूर्तीची मूळ मूसही एकच हवी. तसे नसते तर तुकाराम-बोवांनी छत्रपतींना समर्थाकडे बोट दाखविले, या इति-हासाला काही अर्थच राहता ना ! गोखले–गांधीमध्येही हृदयवीणेच्या तारा एकसुरी स्पंदन देत. हाती घेतलेल्या कामाचा पिच्छा एकनाथाच्या एकनिष्ठेने पुरवावा व त्यासाठी वेळ पडल्यास क्यासाब्यांकाचा कस दाखवावा; पतिताच्या पावनतेसाठी झटावे–गोखलेगांधींच्या चरित्र-गंगाचे पाणी पारखताना असे एकजिनसी दिसते यात शंकाच नाही. मात्र, गोखले म्हणजे उगमाजवळची, तर गांधी म्हणजे बहुजनसमाजाची तारवे वाहणारी सागर माप बहुमुखी गंगा होय, हे अभ्यासू दृष्टीतून सुटत नाही.

— अभ्युदय, कऱ्हाड.

★

# ७ महात्माजींची गुरुगीता

( नामदार गोखले यानी आपले शिष्योत्तम महात्मा गांधींसंबंधी काढलेले उद्‌गार. त्यावरूनविसाव्या शतकाच्या पहिल्या दशकातही महात्माजींचे सत्याग्रहतेज कसे प्रभावी होते हे स्पष्ट होते. )

ट्रान्सवालमध्ये १९०६ साली सर्व भारतीयास स्वतःची सरकारदरबारी नाक मुठीत धरून नोंद करण्याची सक्ति करणारा वटहुकूम जारी झाल्यावर, आणि त्यास ब्रिटिशसाम्राज्य-सरकारने मान्यता दिल्यावर तो वटहुकूम मानावयाचे कारण नाही, असे ठरविणाऱ्या भारतीयांनी इंग्लंडकडे एक शिष्टमंडळ पाठविले. " त्या शिष्टमंडळाचे प्रमुखत्व आमचे श्रेष्ठ व आदर्श देशबांधव श्री. गांधी यांचेकडे होते. प्रतिनिधि-बांधवहो, त्या कामी श्री. गांधींनी आपले अमर कार्य उरकल्यावर, मला असे म्हटल्यावाचून राहवत नाही की, कोणत्याही भारतीयाला कोणत्याही काळी, इथे आणि भारतीयांच्या

दुसऱ्या कोणत्याही मेळाव्यात त्यां ( गांधी ) चे नाव उत्कृष्ट भावनेने आणि अभिमानानेच घेणे शक्य होईल. ( यावेळी सर्व श्रोतृसमाज आपल्या चवड्यावर उभा राहिला आणि त्याने गांधीजींचा जयजयकार टाळ्यांच्या गजरात केला. ) श्री. गांधींचा व माझा घनदाट परिचय आहे व तो अगदी जवळून आहे, ही माझ्या जीवनातील एक भाग्याची गोष्ट असून मी आपणास सांगू शकतो की, ( गांधीपेक्षा ) अधिक शुद्ध, अधिक उदात्त, अधिक शूर व अधिक उन्नत आत्मा या पृथ्वीतलावर वावरलाच नाही. ( टाळ्याच टाळ्या ) स्वतः संतस्वीकृत साधी राहणी पत्करून आणि आपल्या म्हटलेल्या जीवमात्राशी प्रेमभक्तीच्या उच्चतम तत्वानी भरलेली सेवावृत्तीची वागणूक ठेवून सत्य व न्याय यांच्या प्रतिपालनाने आपल्या गरीब बांधवांची नजर जे जादूने भारल्यासारखी भारून टाकतात आणि त्या ( बांधवां ) ना जीवनाचा नवा प्रकाश देतात, अशा महान् माणसापैकी गांधीजी एक आहेत. माणूस पण माणूस विभूतींची विभूति, देशभक्तातील देशभक्त असे गांधींचे वर्णन करता येईल आणि आपणास भलेपणाने म्हणता येईलच

येईल की, त्यां ( गांधीं ) च्यामध्ये भारतीय माणस-कीची पराकोटी प्रस्तुत साली मूर्तिमंत अवतरली आहे. इंग्लंडला गेलेल्या शिष्टमंडळाचे नेतृत्व गांधींनी केले आणि त्यांच्या परिश्रमामुळे, तसेच आपल्या बाजूला न्याय असल्यामुळे, त्या ( ट्रान्सवालच्या ) वटहुकमाला बादशाही संमति मिळाली नाही. " ( लाहोर येथील चोविसाव्या काँग्रेसमधील ना. गोखले यांचे भाषण— ना. गोखले यांची भाषणे पृ. ८६२ नटेसन आणि कंपनी )

तरीही ट्रान्सवॉलमधील भारतीयांच्या कपाळीचा लढा संपला नव्हता आणि– " श्री. गांधी व जनरल स्मट्स यांच्यामध्ये तडजोड झाली ती दोन्ही बाजूंनी सन्माननीय अशी शांतिमय झाली. पण उप्परकी तो बहोत बनी, लेकिन् अंदरकी बात वेगळीच ठरली. ट्रान्स-वालमधील सुमारे आठ हजार भारतीयापैकी साडेसात हजार लढचात होते. आता त्या वसाहतीत भारतीयांची एकंदरच संख्या सहा हजारांची झाली आहे; आणि जरी त्यापैकी बहुतेक या लढ्याबद्दल अंतःकरणपूर्वक

सहानुभूति बाळगीत असले आणि पैशानी व इतर तऱ्हानी चळवळीला सहाय्य करीत असले तरी, छळांचा घाणा पाचशे शूरांच्या तुकडीलाच ओढून न्यावा लागत आहे. त्यांचे नेतृत्व अदमनीय गांधीजीकडे आहे. गांधी म्हणजे विशालच विशाल अशा आत्मिक सामर्थ्याचा शूरवीर असून त्यांचा पिंड हा महान् विभूतीचा आणि हुतात्म्याचा आहे." (ना. गोखल्यांचे ९ सप्टेंबर १९०९ रोजीं मुंबईस टौनहॉलमध्ये झालेले भाषण पहा. )

त्यानंतर टान्सवॉलमध्यें गांधीजीनी सत्याग्रह सुरू केला, तेव्हा

" सर्व चळवळीची ज्या सुरेख पद्धतीने टापटीप राखलेली आहे तिच्याकडे पहा. हिंदु, मुसलमान, पारशी एकजीव संघटित झाले आहेत आणि आपल्यातील नेहमीचे भेदभाव नि हालअपेष्टा आश्चर्यकारक स्वयंसंयमाने पार विसरून गेले आहेत. खरोखरच, ' जादुगिरी यात पुरी ' करणाऱ्या माणसाने उच्च नैतिक सामर्थ्य प्रकट केले असून त्याची संभावना अशी तशी

होता कामा नये. आणखी असे पहा की, एकंदर लढा तर तीव्र आणि तीव्रत्तर होत गेला आहे. तो किती जरी महिने चालला, तरी गांधींच्या दुष्मनातील दुष्मनालाही त्यांच्या निष्ठेसबंधी अगर ब्रिटिश सरकारसंबंधीच्या त्यांच्या सर्वसाधारण वृत्तीबद्दल एवढीसुद्धा शंका सूचनेनेही घेता आली नाही. नव्हे, सद्गृहस्थहो, माझी खात्री आहे की आपणा सर्वानाच असे वाटते की दुसरे सगळे मार्ग खुंटल्यावर गांधीजीनी सत्याग्रहाचा आश्रय करण्यात त्यानी न्याय्य तेवढेच केले आहे. माझी खातरजमा आहे की आपल्यापैकी कोणी जरी या काळात ट्रान्सवॉलमध्ये असतो, तर आपण गांधींच्या निशाणाखाली रांगेने सज्ज राहण्यात भूषण मानतो; एवढेच नव्हे तर त्यांच्याबरोबर कामाचा उठाव करून त्यांच्याबरोबरीने त्यांच्या कार्यातील दंडकारण्य सोसत राहतो." ( मुंबई टौनहॉलमधील ना. गोखले यांचे भाषण १९०९. )

यानंतर ता. ९ ऑक्टोबर १९०९ रोजी मुंबईच्या टौनहॉलमध्येच विद्यार्थी व राजकारण या विषयावर बोलताना ना. गोखले म्हणाले की—

" आता, निष्ठा ही कर्तृक भावना आहे. आपली ज्या सांप्रदाय–परंपरेवर भक्ति असेल तिच्या विरुद्ध विघातक काही करण्यापासून अलिप्त रहावयाचे. एवढेच नव्हे तर त्या सांप्रदायाच्या अस्तित्वावरच घाला येण्याचा धोका असेल, तर त्या ( सांप्रदाया ) ला सावरून धरण्यासाठी साहसाने धाव मारण्याची तयारी ठेवणे या गोष्टीचाही निष्ठेत समावेश होतो. या वृत्तीने आपण जागरूक असू तर एकाद्या विशिष्ट कारभारातील काही एका प्रकरणाशी वा प्रकरणसमूहाशी आपल्याला विवेकशुद्ध सामना करणे आवश्यकच आहे असे वाटल्यास, आपण तसा सामना करण्यास सज्जच होऊ, ते आपल्या अखत्यारीत असलेल्या सर्व सनदशीर साहित्यसाधनानिशीच !! या बाबतीत आपले महान् देशबांधव गांधीजी यानी मोठे चमकदार उदाहरण घालून दिले आहे. गेल्या दोन वर्षात ट्रान्सवॉल सरकारच्या कठोर आणि अपमानास्पद कारवाईच्या मालिकेशी सामना देण्यात ते (गांधीजी) गर्क असून त्यांच्या कार्यपद्धतीला दाखविण्यासारखी जोडच नाही. पण अशा तऱ्हेने सामना

चालवित असतानादेखील त्या (गांधी) च्या दुष्मनातील दुष्मनालाही इंग्लंडविषयी त्यां (गांधी) च्या वृत्तीवर, बुद्धिवादास पटेल असा, एवढासा देखील संशयाचा खडा मारता यावयासही, त्यानी जागा ठेवली नाही. "

गुरुने 'शिष्यादिच्छेत्पराजयतम् !' या वृत्तीने केलेली वरील शिष्यप्रशंसा इतिहासाने सत्यच सत्य ठरविली आणि महात्माजींची राष्ट्रपिता म्हणून प्रत्येक भारतीय अंतःकरणात कृतज्ञतेने नोंद झाली. धन्य ते गुरु, धन्य ते शिष्य.

– कल्याणयात्रा, मुंबई.

★

# ८ म. गांधीस

हे आम्ही तुज वंदितो जिवलगा शूरोत्तमा सात्विका ।
स्वातंत्र्यप्रभु शान्तिसेवनि तुला ज्या ध्यास लागे निका ।।
काटचानी भरल्या पथा तुडविण्या काही न वाटे मुळी ।
पाणी आणिक सोडलेस तयि तू,अन्ये जया लोभली ।।१।।
ना तू एकच येसि, आणिसि परी जे जे तुझे आखिले ।
घालाया निज मायभूमिचरणा, होमावया रोखिले ।।
ते ते सर्वच ज्या जिवापलिकडे सांभाळताती जन ।
नाही जाऊनि द्यायचे चुकुनिही, ऐसे करोनि मन ।।२।।
गांधी, आणिक हे करोनि सगळे व्हावे तुला काय गा ? ।
व्हावा न्यायच देशबन्धुस तुझ्या अन्यार्थ हो वावगा ।।
हो हो भारत-पुत्ररत्न-परमश्रेष्ठा, महन्मंगला ।
सर्वांहून अलिप्त उंच वससी, कोठे तुला ना तुला ।।३।।
"होवो मंगल वाटचाल तव" हा आशी कशाचा तुला? ।
आम्ही शाश्वत कीर्तिमंदिरि तुला अत्यादरे पूजिला ।।

(ता. २६-१-१४ रोजी लंडन येथे मिस्तर के. एच. डी. सेसिल यांनी केलेल्या कवितेचा अनुवाद)

★

# श्री. पु. पां. गोखले यांची पुस्तकें.

| पुस्तक | | रु. पैसे |
|---|---|---|
| अठराशे सत्तावनचा महाराष्ट्र (दुसरी आवृत्ति) | | १–५० |
| अठराश्लोकी गीता (सहावी आवृत्ति) | ... | ०–३० |
| (मराठी, हिंदी, संस्कृत, गुजराथी, इंग्रजी) | | |
| आगरकर–चरित्र (चवथी आवृत्ति) | ... | |
| आगरकरांशी ओळख (पैलुदार अभ्यास) | ... | |
| ईशावास्य (मराठी, दुसरी आवृत्ति) | ... | |
| एकाध्यायी गीता | ... | |
| (मराठी, हिंदी, संस्कृत, इंग्रजी) | | |
| कर्मयोगी सोमण (यशोलोचना) | .. | |
| काँग्रेसपक्ष (जोशी लोखंडे प्रकाशन) | ... | ३–०० |
| गीताधर्म–प्रवेश (गीतेचा सूक्ष्म अभ्यास) | ... | |
| गोखले–गांधी | ... | ०–२५ |
| गोखल्यांच्या गोष्टी | ... | |
| जागृत सातारा (सातारा जिल्ह्याचा इतिहास १९६५ पर्यंतचा; दुसरी आवृत्ति) | ... | |
| दिलके बोल (हिंदीतून पत्रव्यवहार) | ... | |

परिचित सातारा ...
(सातारा जिल्ह्याची सामाजिक, आर्थिक पहाणी)
बाबा राघवदास (हिंदी महंत-चरित्र) ... २-५०
बोल-बाला (निवडक व्याख्याने) ...
भारतभाव ..
(स्वातंत्र्यासंबंधी भारतीयांची जबाबदारी)
भारतसेवक नामदार गोपाळ कृष्ण गोखले ...
मुंजा मुलास ... ०-०६
राष्ट्रभाषामें आगरकर ...
ललित लहरी ...
लोकप्रिय भाऊसाहेब सोमण ...
शुभमंगल सावधान ...
समर्थ संप्रदाय ...
समर्थांचा विशद भक्तिमार्ग ...
सहकार-संपदा ..
सातारा जिल्ह्याची कालवाचक क्रियापदे ...
साहित्यिक कऱ्हाड ... ०-५०

★